**कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना**

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २११ /२०२४ दि. २२/१०/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने विविध राजकीय पक्षांचे नामनिर्देशन पत्र दाखल करणे व उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रीया दिनांक २२/१०/२०२४ ते दिनांक ०४/११/२०२४ रोजी पावेतो मा. निवडणूक निर्णय अधिकारी १४४ – कल्याण ग्रमिण विधानसभा मतदार संघ यांचे कार्यालय, ह.भ.प. सावळाराम महाराज क्रिडा संकुल येथील जलतरण तलावाजवळ, सावित्रीबाई फुले नाट्यगृह, घरडा सर्कल, डोंबिवली पूर्व येथे पार पडणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) डोंबिवली स्टेशन, चार रस्ता, टिळक चौक, शेलार नाका मार्गे घरडा सर्कलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शिवम हॉस्पिटल, डोंबिवली पूर्व** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने शिवम हॉस्पिटल येथून उजवीकडे वळून जिमखाना रोड, सागर्ली मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) सुयोग रिजन्सी अनंतम, पेंढारकर कॉलेज मार्गे घरडा सर्कलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आर. आर. हॉस्पिटल, डोंबिवली पूर्व** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने आर. आर. हॉस्पिटल येथून डावीकडे वळून कावेरी चौक, एम.आय.डी.सी. मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) खंबाळपाडा रोड, ९० फुट रस्ता, ठाकुर्ली रोड कडून घरडा सर्कलकडे तसेच विको नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **बंदिश पॅलेस हॉटेल** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** खंबाळपाडा रोड, ९० फुट रस्ता, ठाकुर्ली रोड कडूनयेणारी वाहने **बंदिश पॅलेस हॉटेल येथुन डावीकडे वळुन विकोनाका मार्गे** इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) आजदे गाव व आजदे पाडा कमान येथून घरडा सर्कल मार्गे बंदिश पॅलेस हॉटेलकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **घरडा सर्कल** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** आजदेगाव व आजदे पाडा कमान येथून बाहेर पडणारी वाहने डावीकडे वळून शिवम हॉस्पिटल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दिनांक २२/१०/२०२४ ते दिनांक ०४/११/२०२४ रोजी पावेतो सकाळी १०:०० ते सायंकाळी १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/—सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग,/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner